# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** वसंतनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/05/2025 01:53

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 16/05/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/05/2025
**Time From (वेळेपासून):** 13:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/05/2025 **Time (वेळ):** 23:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/05/2025 00:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विश्राम ग्रुह भोजन कक्ष , वसंतनगर ,पुसद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नोगिता आनंदराव बोरकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिला ड्रायव्हिंगस्कुल जिरापुरे,दारव्हा ,दारव्हा ,वसंतनगर,यवतमाळ,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | अविनाश बरडे यांचघरी ,मौजा तरोडा ,दारव्हा ,दारवा ,यवतमाळ,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8262893029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरज गोपाल बाहेती | | | 1. हुडको कलनी, ता मंगरूळपीर, , मंगरूळपीर ,मंगरूळपीर,वाशिम, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मयुर सुधाकर मेहकरे | | | 1. कसबे गव्हाण, ,ता अंजनगावसुर्जी,ता अंजनगावसुर्जी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | बिभिषण शिवाजी जाधव | | | 1. आरळी बुद्रुक तुळजापुर,, तुळजापुर,,तुळजापूर,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |
| 4 | बलदेव नारायण राठोड | | | 1. गव्हा, ता मानोरा,, मानोरा,, मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

लेखी

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांकः 16/05/2025माझे नांवः- श्रीमती नोगिता आनंदराव बोरकर वय 42 वर्ष रा.ह.मु.मौजा तरोडा श्री.अविनाश बरडे यांचे घरी ता.दारव्हा जि.यवतमाळ मुळ रा.शिला ड्रायव्हिंग स्कुल जिरापुरे नगर, दारव्हा जि. यवतमाळ मो.क्र. 8262893029/9970966108 मी वरिल प्रमाणे तरोडा ता.दारव्हा येथील रहीवासी आहे. माझे सरकारमान्य न्यु.शिला ड्रायव्हींग स्कुल या नावाने नविन कोर्टाच्या समोर, एम.एच.29 चहाच्या बाजुला,दारव्हा जि.यवतमाळ येथे ड्रायव्हींग स्कुल आहे. त्याचा रजिस्टर्ड नंबर एम.एच.292024 डि.एस.एल. 00002 असा आहे. सदरचे ड्रायव्हींग स्कुल मी सन 2016 पासुन चालवित आहे. माझ्या ड्रायव्हींग स्कुल मध्ये मी इच्छुक लोकांना दुचाकी व चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देते तसेच त्यांना प्रशिक्षण झाल्यावर आर.टी.ओ. कडुन परवाना प्राप्त करुन देण्याकरिता त्यांचे फॉर्म भरणे व ट्रायल करिता प्रशिक्षणार्थींना हजर ठेवते व याकरिता त्यांना मदत करते. यवतमाळ जिल्हयात आर.टी.ओ.कडुन वेगवेगळ्या तालुक्यात वाहन चालविण्याचे परवाने देण्याकरिता कॅम्प आयोजित केले जातात. सदरचे कॅम्पवेळी मी स्वतः माझे विद्यार्थ्यांसोबत हजर राहुन त्यांना मदत करत असते. त्यावेळी आर.टी.ओ. अधिका-यां कडुन अधिकृत शासकीय चलना व्यतिरिक्त प्रत्येक फॉर्म मागे 200/- रुपये अतिरिक्त स्वतः करिता मागणी करण्यात येते. माझेकडे देखील माझ्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना वाहन चालविण्याचा परवाना देण्याकरिता ते 200/- रुपये मागतात. परंतु मी ते या अगोदर दिलेले नाही. शुक्रवार दिनांक 02/05/2025 रोजी दारव्हा येथे आर.टी.ओ.जाधव साहेब व त्यांच्या सोबत असणारे इतर अधिकारी हे त्यांचा खाजगी एजन्ट नामे श्री. बलदेव याचे मार्फतीने कॅम्प असतांना त्यांनी माझ्या विद्यार्थ्यांचे ड्रायव्हींग लायसन काढुन देण्याकरिता प्रत्येकी 200/- रुपये शासकीय फि. व्यतिरिक्त लाचेच्या रकमेची मागणी केली होती. परंतु मी सदची रक्कम देण्यास नकार दिला होता. अशाच प्रकारे आर.टी.ओ.अधिकारी प्रत्येक कॅम्प वेळी खाजगी इसम नामे श्री. बलदेव याचे मार्फतीने पैशांची मागणी करतात. आर.टी.ओ.अधिकारी स्वतः पैसे मागत नाही परंतु बलदेव च्या मार्फतीने पैसे मागतात त्यामुळे आपण दिनांक 07/05/2025 रोजी पुसद येथे आर.टी.ओ.अधिकारी श्री.जाधव साहेब यांचा कॅम्प लागणार आहे. त्यावेळी आपण पुसद येथे येवुन माझी तक्रार घेवुन पडताळणी करुन कॅम्पला हजर राहणारे आ.टी.ओ.अधिकारी यांनी स्वतः अथवा त्यांचा एजन्ट श्री. बलदेव यांनी माझेकडे शासकीय फि शिवाय लाच रकमेची मागणी केल्यास सापळा कार्यवाही आयोजित करावी अशी मी पोलीस निरीक्षक श्री.अर्जुन घनवट यांना माझ्या फोनव्दारे दिनांक 06/05/2025 रोजी विनंती केली होती. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.अर्जुन घनवट हे त्यांचे पथक व दोन पंचासह दिनांक 07/05/2025 रोजी कॅम्प पुसद येथे येवून मी पंचासमक्ष माझी लेखी तक्रार

दिली होती. माझेकडे जयशिल राजेंद्र कांबळे रा. गुंज मो.क्र. 9322349472 हा विद्यार्थी दुचाकी/चारचाकी वाहना चालविण्याचे प्रशिक्षण घेत आहे. त्याचे प्रशिक्षण पुर्ण झाले असुन त्याला वाहन परवाना मिळावा याकरिता त्याने आर.टी.ओ.यांना ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. व शासकीय फि भरण्याकरिता माझेकडे 350/- रुपये दिलेले आहे व मी त्याचा ऑनलाईन अर्ज सादर करुन 350/- रुपये शासकीय फि भरलेली आहे. दिनांक 07/05/2025 रोजी पुसद येथे आर.टी.ओ.तर्फे होत असलेल्या कॅम्पमध्ये ट्रायल करिता तो स्वतः हजर राहणार असुन त्याने लायसन फॉर्म जमा करणे व शासकीय फि भरणे याकरिता मला त्याचे समंतीपत्र दिलेले आहे. परंतु आर.टी.ओ.श्री.जाधव साहेब व इतर आर.टी.ओ. अधिकारी हे नेहमीप्रमाणे शासकीय फि व्यतिरिक्त स्वतः करिता अतिरिक्त लाभ म्हणुन माझेकडुन आणखी 200/- रुपये मागणी स्वतः अथवा त्यांच्या एजन्ट नामे श्री.बलदेव याच्या मार्फत करतील त्यामुळे आपण माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरिता पंचासह कार्यवाही आयोजित करावी अशी विनंती केली होती. विनंती आहे. तसेच ते लाचेची मागणी करतांना "जि" हा कोडवर्ड चा वापर करतात. यापुर्वी दिनांक 03/04/2025 रोजी आर.टी.ओ.कॅम्प दारव्हा येथे होता त्यावेळी कॅम्प करिता आर.टी.ओ.पाटील साहेब व आर.टी.ओ.कांबळे साहेब होते. त्यादिवशी मी पैसे न दिल्यामुळे माझे खुप विद्यार्थी त्यांनी जाणुनबुजून फेल केले. फेल करण्यापुर्वी त्यांनी मला त्यांचा एजन्ट नामे श्री.बलदेव याच्या मार्फतीने त्यांचा मोबाईल क्रमांक 7620741060 यावरुन माझा मोबाईल क्रमांक 8262893029 यावर बरेच कॉल केले होते. परंतु मी बलदेवला स्पष्टपणे मी कोणतीही लाच रक्कम देणार नाही असे सांगितले होते. त्यानंतर त्यांनी सुडबुध्दीने माझे विद्यार्थी फेल केले होते. मी याबाबत आर.टी.ओ. कार्यालय,यवतमाळ येथे दिनांक 07/04/2025 रोजी लेखी तक्रार देखील केली होती. परंतु सदर तक्रारीवर कोणतीही कार्यवाही न करता ते त्यांचा एजन्ट नामे श्री.बलदेव याचे माध्यमातुन वारंवार लाच रक्कम मागत आहेत. बलदेव हा आर.टी.ओ. अधिका-यांचा एजन्ट असुन संपुर्ण यवतमाळ जिल्ह्यात कॅम्पवेळी तो हजर असतो व तो बेकायदेशीर पैसे गोळा करुन आर.टी.ओ.अधिका-यांना देतो. तो खाजगी इसम असुनही प्रत्येक कॅम्पमध्ये तो सामिल असतो व अधिका-यांच्या सोबत असतो. त्यामुळे आज कॅम्प करिता येणा-या आर.टी.ओ.जाधव साहेब किंवा त्यांच्या सोबत असणा-या इतर अधिकारी यांनी स्वतः अथवा त्यांचा एजन्ट बलदेव याचे माध्यमातुन लाच मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी कारण मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी त्यांचे विरुध्द आज रोजी लेखी तक्रार देत आहे. माझी आर.टी.ओ. अधिकारी श्री.जाधव साहेब, इतर आर.टी.ओ.अधिकारी व श्री.बलदेव यांचे सोबत दुष्मनी नसुन देवाणघेवाणीचा उसणवारीचा कोणताही व्यवहार आमचेमध्ये नाही. सोबत मी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी जयशिल कांबळे याने मला दिलेले संमतीपत्र व माझेकडे प्रवेश घेतल्यानंतर मला दिलेली फि ची पावती व आर.टी.ओ.यवतमाळ यांना केलेली तक्रारीची छायांकित प्रत यासोबत जोडुन सादर करित आहे. यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री. अर्जुन घनवट यांना पंचासमक्ष सांगीतले की, '' आर.टी.ओ.अधिकारी व श्री.बलदेव हे आर.टी.ओ कॅम्प पुसद येथे कॅम्प करीता दिनांक 07/05/2025 रोजी येणार आहेत. तरी आपण माझ्या तक्रारीची पडताळणी करून लाच मागणी केल्यास सापळा कार्यवाही आयोजीत करावी अशी विनंती केल्यावरून त्यांनी सरकारी पंच माझे सोबत पाठवून माझ्या तक्रारीची पडताळणी केली होती. त्यावेळी कॅम्प करीता आर.टी.ओ. अधिकारी श्री. सुरज गोपाल बाहेती, श्री. मयुर सुधाकर मेहकरे, श्री. बिभिषण शिवाजी जाधव व खाजगी ईसम बलदेव नारायण राठोड हे कॅम्प करीता हजर होते. त्यावेळी मी या अधिका-यांची व खाजगी ईसमाची भेट घेतली व त्यांना माझे काम झिरो बजटमध्ये करा माझी कंन्डीशन खराब आहे अशी विनंती केली होती. परंतु वरील तिन्ही अधिकारी यांनी तुमच्याशिवाय ईतरही लोक आहेत, तुम्हाला एक न्याय व बाकीच्यांना वेगळा न्याय असे करता येणार नाही, तुम्ही तुमचे जे काही म्हणने असेल ते बलदेवला सांगा आम्ही त्याच्या मार्फतीने तुम्हाला कळवू, असे वारंवार सांगत होते. सदर सरकारी अधिकारी बलदेव राठोड या खाजगी ईसमाच्या मार्फतीने माझेकडील सेटलमेन्ट करण्याकरीता सांगत होते. परंतु मी सेटलमेन्ट न केल्याने त्यांनी मला "पुढच्या कॅम्पच्यावेळी या, तेव्हा आम्ही सर्वजन वर कळवून, तुम्हाला सांगतो," असे म्हणाले होते. त्यानंतर मी परत जावून सदरची हकीकत पोलीस निरीक्षक श्री. अर्जुन घनवट लाप्रवि यवतमाळ यांना पंचा समक्ष सांगीतली होती. त्याबाबत शासकीय व्हाईस रेकॉर्डरने रेकॉर्डींग करण्यात आले आहे. त्यावरुन पंच, मी स्वतः व पथकाने सदरचे रेकॉर्डींग ऐकून त्याचा सविस्तर पडताळणी पुर्व, पडताळणी पंचनामा क्रमांक 01 केला आहे. तो मी सांगीतले प्रमाणे बरोबर असल्याचे पंचानी देखील सांगीतले होते. सदरचा पंचनामा पुर्ण करून त्यावर दोन्ही सरकारी पंचांनी व पडताळणी अधिकारी श्री. घनवट यांनी समक्ष सहया केल्या होत्या. आर.टी.ओ अधिकारी बाहेती यांनी पुढच्या कॅम्पच्यावेळी सेटलमेंन्ट करण्याकरीता बोलविल्याने पुन्हा दिनांक 16/05/2025 रोजी पुसद येथे कॅम्प असल्याने पडताळणी करण्याची मी पंचासमक्ष विनंती केली होती. त्यावरून आज दिनांक 16/05/2025 रोजी दोन्ही सरकारी पंच व पोलीस निरीक्षक श्री. अर्जुन घनवट, लाप्रवि यवतमाळ हे त्यांचे पथकासह पुसद येथे उपस्थित झाले होते. आर.टी.ओ अधिकारी हे खाजगी ईसम बलदेव राठोड यांचे मार्फतीने लाच मागणी करीत

असल्याने पुन्हा पंचांच समक्ष पडताळणी करण्याकरीता पाठविले होते. त्याप्रमाणे मी सरकारी पंचांसह खाजगी ईसम बलदेव राठोड याची भेट घेण्याकरीता पुसद येथील शासकीय विश्रामगृह पुसद येथे आले त्यावेळी खाजगी ईसम बलदेव हा आर.टी.ओ अधिकारी सुरज बाहेती यांचेसह शासकीय लॅपटॉपवर काम करत होता, मी त्याला नमस्कार केला व माझ्या कामाबाबत साहेबांशी काय बोलणे झाले आहे? याची विचारणा केली, त्यावेळी त्याने तुम्ही साहेबांशी बोलून घ्या, मग बघू असे सांगीतले, त्यावेळी मी त्याचे शेजारी असलेल्या आर.टी.ओ अधिकारी श्री. बाहेती यांना बोलली की, "सर तुम्ही बाकी लोकांकडून 200/- रूपये घेता, मी तुम्हाला 100/- रूपये देते" त्यावेळी ते म्हणाले की, याबाबत सर्वांसोबत बोलून मग तुम्हाला सांगू, आज तुम्ही जे नेहमी प्रमाणे आहे ते द्या, त्यानंतर मी त्यांना आजच्या दिवशी माझे 10 विद्यार्थी आहेत त्यांचे 2000/- रूपये द्यायचे काय? असे विचारले असता बलदेव व बाहेती साहेबांनी ठिक आहे असे म्हणुन 2,000/-रु. लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी पैसे घेवून पुन्हा कधी येवू असे विचारले असता, बलदेव याने 04 /00ते 04/30 वाजता या सांगीतले. त्यानंतर मी माझ्यासोबत हजर असलेल्या सरकारी पंचासह लाप्रवि पथकाकडे परत गेलो व सविस्तर हकीकत वरिल प्रमाणे दोन्ही पंचासमोर सांगीतली. मी दिलेल्या तक्रारी वरून पंच यांचेसमक्ष लाचमागणी पडताळणी कार्यवाही केली असता पडताळणी दरम्यान आर.टी.ओ. अधिकारी श्री. सुरज गोपाल बाहेती व खाजगी ईसम बलदेव राठोड यांनी समक्ष लाचेची मागणी केली व ती स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच ईतर 02 अधिकारी श्री. मयुर सुधाकर मेहकरे, श्री. बिभिषण शिवाजी जाधव हे देखील तेथे हजर होते. या सर्वांनी खाजगी ईसम बलदेव नारायण राठोड यांचे मार्फतीने प्रत्येकी 01 विद्यार्थीचे 200/- रू. प्रमाणे 10 विद्यार्थ्यांचे एकुण 2,000/-रु. लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते. सदरची लाच रक्कम आजच बलदेव याने 04/00 ते 04/30 वाजता घेवुन या, असे त्यांनी मला सांगितल्याने मी त्यांना होकार दिल्याने आजच दिनांक 16/05/2025 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावरून आज दि. 16/05/2025 रोजी मी 500/- रुपये दराच्या 02 नोटा, 200/- रुपये दराच्या 02 नोटा व 100/- रुपये दराच्या 06 नोटा असे एकुण 2,000/-रु. जमवुन पोलीस निरीक्षक श्री. अर्जुन घनवट यांचेकडे सापळा कार्यवाही करीता हजर केले असता नोटांच्या क्रमांकाचे टिपण तयार करून पोना श्री. राकेश सावसाकडे यांनी सदर नोटांना मी, पंच व पोलीस स्टाफ यांचे समक्ष अँन्थ्रासीन पावडर लावली व सापळा पुर्व पंचनाम्या प्रमाणे संपुर्ण कार्यवाही केली. मला पंचांसह सापळा आजमावण्याकरीता शासकीय विश्राम गृह पुसद येथील आर.टी.ओ कॅम्प येथे पाठविले व पथक हे देखील त्यांचेकडील शासकीय वाहनाने माझे पाठीमागे आले व आर.टी.ओ कॅम्प पुसद येथील विश्राम गृह पुसद येथे सापळा कार्यवाही आजमावली असता माझे सोबत शासकीय पंच क्रमांक 01 होते त्यांचे समक्ष खाजगी ईसम नामे बलदेव राठोड यांनी उजव्या हातांनी 2000/- रूपये लाच रक्कम स्विकारली व त्याचे अंगातील शर्टातील डाव्याखिश्यात ठेवली. त्यावेळी पंच क्रमांक 01 हे माझेसोबत होते. त्यानंतर मी विश्राम गृहाचे बाहेर येवून सापळा लावलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना नियोजीत केलेल्या डाव्या हाताने - (या प्रथम खबरीतील पुढील मजकुर CCTNS च्या तांत्रिक शब्द मर्यादेमुळे समाविष्ट होत नसल्याने ते फिर्याद प्रमाणे / पुरवणी पानासह जोडण्यात येत आहे )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SATISH UTTAMRAO JADHAO(I (Inspector)) / PORN68090 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SATISH UTTAMRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN68090

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 4 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या OI खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

(FIR **मधील उर्वरीत मजकुर येणेप्रमाणे...** ) केसावर हाथ फिरवून ईशारा केला असता अॅन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ चे अधिकारी व अमंलदार यांनी खाजगी ईसम बलदेव राठोड यास त्यांचे जवळील 500/- रुपये दराच्या 02 नोटा, 200/- रुपये दराच्या 02 नोटा व 100/- रुपये दराच्या 06 नोटा असे एकुण 2,000/-रु. लाच रकमेसह ताब्यात घेतले तसेच कॅम्प करीता हजर असलेले ईतर आ.टी.ओ अधिकारी नामे श्री. सुरज गोपाल बाहेती, श्री. मयुर सुधाकर मेहकरे, श्री. बिभिषण शिवाजी जाधव पद सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, वर्ग 3, नेमणुक उपप्रादेशिक परीवहन कार्यालय यवतमाळ यांना ताब्यात घेतले असून पुढील कार्यवाही करीत आहेत. एकंदरीत दि. 07/05/2025 रोजी व दिनांक 16/05/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये लोकसेवक नामे आ.टी.ओ अधिकारी नामे श्री. सुरज गोपाल बाहेती, श्री. मयुर सुधाकर मेहकरे, श्री. बिभिषण शिवाजी जाधव पद सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, वर्ग 3, नेमणुक उपप्रादेशिक परीवहन कार्यालय यवतमाळ यांनी त्यांच्या शासकीय पदाचा दुरउपयोग करून शिकाउ व पक्के वाहन चालविण्याचा परवाना काढण्या करीता ऑनलाईन शासकीय फि शिवाय स्वतःच्या बेकायदेशिर आर्थिक लाभाकरीता संगनमताने खाजगी ऐजंट नामे बलदेव राठोड यास सोबत ठेवून माझे कडून त्याचे मार्फतीने प्रत्येक शिकाउ व पक्के वाहन चालविण्याचे परवाने देण्याकरीता प्रत्येकी 01 विद्यार्थीचे 200/- रू. प्रमाणे 10 विद्यार्थ्यांचे एकुण 2,000/-रु. लाच रक्कमेची मागणी करून ती आज रोजी दिनांक 16/05/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान दुपारी 13/30 वा. ते सायंकाळी 17/10 वा. दरम्यान शासकीय विश्रामगृह,पुसद येथील भोजन कक्ष येथे स्विकारली असल्याने माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर तक्रार आहे. माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टंकलिखित केली असुन मी वाचुन पाहिली ती घडलेल्या घटनेनुसार बरोबर व खरी आहे. अशा फिर्यादीच्या लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा नोंद.

ठाणे अमलदार
पो.स्टे. वसंत नगर,पुसद